**MHKO120001452015**

नियमित दिवाणी दावा क्र.३२/२०१५
(CNR No.MHKO120001452015)

## निशाणी क्र.१०३ खाली आदेश

वादी यांनी सदर अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ०६ नियम १७ प्रमाणे त्यांच्या दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी केलेला आहे.

०२. वादीच्या कथनानुसार, प्रस्तुत दावा वादी यांनी प्रतिवादींच्या विरुध्द वाटणीसाठी, स्वतंत्र कब्जासाठी, हक्कज्ञापन व मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादी यांनी दावा मिळकत गट क्र.१५२(अ) व १५२(ब) ही कै. शंकर बाळा शेटी यांची स्वसंपादीत मिळकत होती हे दर्शविणेसाठी काही कागदोपत्री पुरावा सादर केला असुन त्याअनुषंगाने वादी यांना आपल्या दाव्यामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेची विनंती केली आहे.

वादी यांनी दाव्यातील पॅरा.२ चे खाली '२अ' मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेची विनंती केली आहे.

(२-अ) दावा मिळकतीचे मौजे पाटगांव, ता. भुदरड येथील गट क्र.१५२ क्षेत्र ९ हे. ३३.८ आर आकार ७ रु. ३१ पैसे शेखाचा नंबर ही तिचे मुळ मालक 'कै. शंकर बाळा शेटी' हेच एकमेव खुद्द मालक होते. ‘सदरची मिळकत ही त्यांनी स्वतःचे उत्पन्नातुन सरकारी लिलावात घेतली होती.’ ते मुंबईस बॉम्बे पोर्ट ट्रस्टमध्ये गोदी कामगार म्हणुन नोकरी करीत होते. त्या त्यांच्या पैशातुन त्यांनी ही जमीन वैयक्तिक खरेदी घेतलेली होती. त्याना वडिलार्जित अशी काही जमीन नव्हती. ते मुळचे पाटगांव गावचे राहाणारे नव्हते. ते घाटाखालुन पाटगांव गावी राहणेस आले होते. त्यांना पत्नी अगर मुलगा, मुलगी असे कोणीही नाही. तसा मजकुर त्यांनी त्यांचे मृत्युपत्रात नमुद आहे.

त्यांना नारायण व लक्ष्मण या नावाचे दोन बंधु होते. नारायण हे मयत असुन त्यांना विठ्ठल, बाळकृष्ण, रामचंद्र, श्रीकांत, अनंत व सुधाकर असे मुलगे असुन वरील मुलापैकी रामचंद्र हा हयात नाही. त्यास रुपेश या नावाचा मुलगा आहे. तसेच त्यांचा दुसरा भाऊ लक्ष्मण हा 'मयत' असुन त्याची जयवंती या नावाची पत्नी हयात आहे व सदर जयवंती इजला विमल या नावाची (सुशिला) मुलगी विवाहीत आहे.

त्यानी त्यांचे वरील गट क्र.१५२ या जमीनीबद्दल त्यांचे पश्चात कोणताही तंटा, बखेडा राहु नये व होवु नये यासाठी त्यानी (नि.३२/१) मृत्युपत्र हे स्वेच्छेने व विचारपूर्वक आणि त्यांची मानसिक व शारीरिक प्रकृती उत्त असताना त्यानी हे मृत्युपत्र लिहुन ठेवले आहे व त्यांच्या इच्छेनुसार सदर त्यांची गट क्र.१५२ ही जमीन त्यांची वैयक्तिक एकटयाची स्वआर्जीत असलेने त्याची विल्हेवाट लावणेचा त्यांना एकटेला हक्क व अधिकार असलेने या मृत्युपत्राने (मी) त्यानी ही जमीन (माझा) भाऊ नारायण याची मुले विठ्ठल, बाळकृष्ण व श्रीकांत, अनंत आणि सुधाकर तसेच नारायण याचा नातु रुपेश रामचंद्र शेटी याना समान हिस्सेने देत आहे. त्याप्रमाणे माझे पश्चात त्यानी सदर शेखाचा नंबर ही जमीन पुर्ण मालकी वहिवाटीने उपभोगणेची आहे. सदर मुलाखेरीज बाकी कोणालाही सदर जमीन जाणेची नाही व तशी देणेची माझी इच्छा नाही.'हा मजकुर सुध्दा त्यानी मृत्युपत्रात नमुद केला आहे.'

तसेच माझे अंतकाळी माझी काही जंगम जिनगी इस्टेट असेल तर ती ही सर्व माझे पश्चात सदर नारायण यांचे वरील मुलाना, नातु रुपेश यास समान हिस्सेने माझे पश्चात जाणेची आहे. सदर प्रमाणे मी माझे इस्टेटीची विल्हेवाट सदर मृत्युपत्राने लिहुन ठेवत आहे. त्याप्रमाणे माझे पश्चात निर्गत होणेची आहे. अशा आशयाचे रजिस्टर्ड मृत्युपत्र शासकीय कार्यालयात नोंदणी केलेले आहे. ते अस्सल मे. कोर्ट मजकुरी दाखल केलेले आहे.'

तसेच वादी यांनी दाव्यातील पॅरा.१० या विनंती क्लॉज मधील (अ-१) चे खाली (अ-२) मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेची विनंती केली आहे.

'वादीने मे.कोर्टात नि.३२/१ सोबत दावा मिळकती संदर्भातील अस्सल नोंदणीकृत मृत्युपत्राने कै.शंकर बाळा शेटी यानी त्यांचे इच्छेप्रमाणे त्यांचे हयातीतच त्यांचे स्थावर जंगम मिळकतीची विल्हेवाट लावणेची केलेली इच्छा व त्याप्रमाणे वाटप व्हावे.'

०३. सदर दुरुस्ती करणेस वादी यांना परवानगी दिलेस प्रतिवादी यांचे काहीही नुकसान होणार नाही व वादी व प्रतिवादी यांचेमधील वाद कायमचे सोडविण्यास व सुलभ न्यायदान करणेस मदत होणार आहे. सबब वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

०४. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने प्रतिवादी तर्फे विधिज्ञ यांनी प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन वादी यांनी मागणी केलेल्या दुरुस्तीस त्यांची तीव्र हरकत असल्याचे नमुद केले आहे. प्रतिवादींचे कथनानुसार, प्रस्तुत दुरुस्तीस मान्यता दिलेस दावेचे स्वरुप बदलणार आहे. सबब त्यांनी प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०५. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीतर्फे विधिज्ञ यांनी निशाणी क्र.११६ वर प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने लेखी युक्तीवाद दाखल केला आहे. प्रतिवादी तर्फे विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला.

०६. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने खालील प्रश्नबिंदु माझ्या निदर्शनास येतात. सदर प्रश्नबिंदु त्यावरील निष्कर्ष व कारणमीमांसेसह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **प्रश्नबिंदु** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | वादी मागणी प्रमाणे दावा दुरुस्तीचा आदेश मिळण्यास पात्र आहे का ? | होकारार्थी |
| २) | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**प्रश्नबिंदु क्रमांक १ व २ करिता कारणे :- (दावा दुरुस्ती व आदेश)**

०७. प्रश्नबिंदु क्र.१ व २ हे एकमेकांशी निगडित असल्याने त्यांच्या कारणांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता ते चर्चेकरीता एकत्रित विचारात घेण्यात आले आहेत.

०८. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता दावा दुरुस्तीच्या अर्जाच्या कामी दाव्यातील गुणदोषांवर भाष्य करणे योग्य ठरत नाही व प्रस्तुत दुरुस्तीच्या अर्जाने जर दाव्यातील वस्तुस्थिती अभिलेखावर येण्यास मदत होत असेल व प्रकरणातील पुढील अडचणी टाळण्यासाठी तसेच बहुविध दाव्यांची संख्या कमी करण्यासाठी मदत होणार असेल तर दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर करणे योग्य ठरेल. तसेच, सदर दुरुस्तीनंतर प्रतिवादी यांना सुद्धा त्यांचे म्हणणे सादर करण्याची संधी मिळणार आहे. तसेच प्रकरणामध्ये दावा मिळकतीशी संबंधीत सर्व माहिती अभिलेखावर असणे अत्यावश्यक आहे.

०९. दिवाणी प्रक्रिया संहिता,१९०८ मधील आदेश ६, नियम १७ मधील तरतूदीनुसार न्यायालयीन कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोहोंपैकी कोणत्याही पक्षकारास त्याच्या वाद कथनास न्याय असेल अशा रीतीने फेरबदल करण्याची मुभा देता येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक असतील त्याप्रमाणे सर्व सुधारणा केल्या पाहिजेत. त्यामुळे, प्रकरणातील पुढील अडचणी टाळण्यासाठी तसेच बहुविध दाव्यांची संख्या कमी करण्यासाठी सदर अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. त्यामुळे उपरोक्त सर्व बाबींचा विचार करून मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने पुढील नेमल्या तारखेपर्यंत अर्जात नमूद केल्याप्रमाणे त्याच्या दाव्यामध्ये दुरुस्ती करावी.

३. वादीने दुरुस्त दाव्याची प्रत मुदतीत अभिलेखावर सादर करावी.

Digitally signed by VASIM BURAN MULLA
Date: 2023.11.06 14:42:20 +0530

**( व्ही. बी. मुल्ला )**

दि. ०६/११/२०२३ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गारगोटी